अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर
दिनांक :– ३०/०५/२०२२

## खबर

मी सौ. अनिताकुमारी जितेंद्र भारती, वय– २५ वर्षे, व्यवसाय– मजुरीकाम, जात– हिंन्दु महार, राह– बिल्डींग नं. ६ पाचवा मजला घर नं ५११ चुंचाळे शिवार घरकुल योजना अंबड नाशिक मुळ राह– जिल्हा– गोरखपुर देवरीया, कर्झनी गाव, पोलीस ठाणे– फलवणी उत्तर प्रदेश, मोबाईल क्र. ९०२८८८६७७३

समक्ष पोलीस ठाणेत हजर होवुन खबर देते की, मी वरील प्रमाणे असुन वरील ठिकाणी माझे दोन मुल राज वय– ७ वर्षे, आणि राजेश वय– ५ वर्षे, तसेच मुलगी नामे सुमिया भारती वय १ वर्षे, ६ महिने असे आम्ही एकत्र राहण्यास आहे. मी चुंचाळे शिवारातील सलमानभाई याचे भंगार दुकानात भंगारचा सामान वेगवेगळा करण्याचे काम करते.

माझे लग्न सन २०१४ साली जितेद्रकुमार भारती याच्यासोबत झाले होते. लग्नानंतर मला वरील तिने मुल माझे पती पासुन झालेत. माझे पती नेहमी दारू पिवुन माझे सोबत भांडण करत असल्याने, तसेच मला घर खर्चाला पैसे देत नसल्याने, मी त्यांना ४ महिन्यापुर्वी सोडुन वेगळे राहु लागली.

मी काम करित असलेल्या सलमानभाई याचे भंगार दुकानात मी रोज सकाळी ०९:०० वाजता काम करण्यासाठी जाते. व सांयकाळी १८:०० वाजता घरी परत येते. दरम्यान माझी मुलगी सुमिया भारती वय १ वर्षे, ६ महिने हिचा साभांळ माझे दोघे मुल राज आणि राजेश हे करतात. ते तिला घेवुन माझे राहत्या घरीच असतात.

काल दिनांक २९/०५/२०२२ रोजी मी नेहमीप्रमाणे सकाळी ०९.०० वा चे सुमारास सलमानभाई याचे भंगारचा गोडावुनवर काम करण्यासाठी गेले होते व मुलगी सुमिया भारती हिला माझे दोघे मुलाजवळ ठेवुन गेले होते. सांयकाळी नेहमीप्रमाणे भंगारचा गोडावुनवरून काम करून मी माझे राहत्या घरी १८:०० वाजता परत आले. त्यावेळी मला माझी मुलगी सुमिया हि घरी दिसुन आली नाही म्हणुन मी माझा मोठा मुलगा राज व लहान मुलगा राजेश यांना सुमियाबाबत विचारणा केली असता त्यांनी माझा हात धरून मला बिल्डींग नं. ०६ च्या पलीकडील रस्तावरील पवार पाटकर क्रेशर प्लॅन्ट चा बाजुला असलेल्या सिमेन्टच्या ओटयाजवळ नेवुन सांगीतले की, आम्ही सांयकाळी सुमिया सोबत येथे खेळत असतांना एक माणुस आला व त्याने आम्हाला दोन रू. देवुन चॉकलेट आणण्यासाठी पाठविले म्हणुन आम्ही चॉकलेट आणण्यासाठी जात असतांना तो सुमियाला उचलुन घेवुन जातांना आम्ही त्यास पाहीले. असे मला माझे मुलांनी सांगीतल्यानंतर मी लागलीच गल्लीतील लोकांना व आजु बाजुचा परीसरातील लोकांना माझी मुलगी सुमियाबददल विचारपुस करू लागली. तेव्हा आमच्या गल्लीतील लोकांनी माझी मुलगी सुमिया हिचा आजुबाजुच्या परीसरात शोध घेतला परंतु ती रात्रभर मिळुन आली नाही. तेव्हा माझी खात्री झाली कि माझी मुलगी सुमिया भारती वय १ वर्षे ६ महिने हिला कोणतरी अनोळखी इसमाने अज्ञात कारणांसाठी फुस लावुन पळवुन नेले असावे. म्हणुन मी त्याबाबत आज रोजी अंबड पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी आली आहे. तसेच माझी मुलगी सुमिया हिचे वर्णन पुढीलप्रमाणे,

(Handwritten margin notes:) भाग-I गुरनं 243/2022 363 आदर्श? पुढील दाखल करणे तपास PSI पवार कडे दिला
दि:30/5/22 स्टे.डा.क्र. 35/2022 वेळ- 16/05 वाजता CCTNS FO 243/2022

**नाव**— कु. सुमिया जितेंद्र भारती वय १वर्षे ६ महिनेराह—
बिल्डींग नं ६ पाचवा मजला घर नं ५११ चुंचाळे
शिवार घरकुल योजना अंबड नाशिक

**वर्णन** :— शरीराने सडपातळ, उंची २ फुट, रंगाने—सावळी,
चेहरा —उभट, नाक — सरळ, डोळे —काळे,
डोक्याचे केस —मध्यम काळे, अंगात केसरी रंगाचा
टी शर्ट, तसेच लाल रंगाची पॅन्ट घातलेली,

तरी दिनांक २९/०५/२०२२ रोजी सांयकाळी १८.०० वा. चे सुमारास माझी मुलगी सुमिया जितेंद्र भारती वय १ वर्षे ६ महिने राह— बिल्डींग नं ६ पाचवा मजला घर नं ५११ चुंचाळे शिवार घरकुल योजना अंबड नाशिक हि माझा मुलगा राज आणि राजेश याच्यासोबत बिल्डींग नं. ०६ च्या पलीकडील रस्तावरील पवार पाटकर केशर प्लॅन्ट चा बाजुला असलेल्या सिमेन्टच्या ओटयाजवळ खेळत असतांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारण्यासाठी कशाचे तरी अमिष दाखवुन फुस लावुन माझे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे. म्हणुन माझी अनोळखी व्यक्तीविरूध्द तक्रार आहे.

माझी वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद मला हिन्दी भाषेत वाचुन समजावुन सांगीतली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलीखीत केलेली आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अंमलदार
अंबडपोलीस स्टेशन नाशिक शहर

ही फिर्याद दिली

1. District (जिल्हा): नाशिक शहर
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0243